दै. कोकणसाद दि. ८ ऑगस्ट २०२५

# कसई-दोडामार्ग नगरपंचायत जि. सिंधुदुर्ग

जा.क्र. KASAOTW25260000829 दि. ०६/०८/२०२५

## जाहीर सूचना

**"महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५"**

**"अधिनियम अंतर्गत विविध लोकसेवा अधिसूचित सेवा देणेबाबत"**

सर्व नागरिकांना, सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था, वाणिज्य संस्था तसेच सर्व राजकीय पक्ष, शासकीय व निमशासकीय कार्यालय तसेच केंद्रीय कार्यालय यांना याव्दारे सूचित करण्यात येते की, लोकसेवा हमी कायद्यातंर्गत नगरविकास विभागाने विविध शासन निर्णयाद्वारे सेवांची यादी प्रसिध्द केलेली आहे. तसेच वेळोवेळी नवीन लोकसेवा यादी प्रसिद्ध करून नगरप्रशासन विभागाला दिली जाते. त्यानुसार सर्व पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित सेवा देण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ कलम ३ नुसार विहित नमुन्यात अर्ज आवश्यक कागदपत्रांसह सादर केल्यास कसई-दोडामार्ग नगरपंचायतीकडून आवश्यक लोकसेवा विहित मुदतीत दिली जाते. याकरिता नगरपंचायततर्फे पदनिर्देशित अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी, व्दितीय अपिलीय अधिकारी यांना पदनिर्देशित करण्यात आलेले आहे. तरी नगरविकास विभागाने विविध शासन निर्णयाद्वारे विहित केलेल्या लोक सेवांची सूची, आवश्यक कागदपत्र फी, नियत पदनिर्देशित अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी, व्दितीय अपिलीय अधिकारी यांची यादी कसई-दोडामार्ग नगरपंचायतीच्या नोटीस बोर्ड वर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**कसई-दोडामार्ग नगरपंचायत**